महाराष्ट्र शासन
**अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-१ व २ यांचे कार्यालय.**
जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जी.पी.ओ. रोड, जि.अहिल्यानगर ४१४००१
Email ID :- excisesupdtahmednagar@gmail.com
Email ID :- excisesupdtahilyanagar2@gmail.com

# !!! जाहीर नोटीस !!!

## अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचे फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रिया राबवून अनुज्ञप्त्या मंजूर करणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकाने ताडी वर्ष २०२५-२६ करिता फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचा फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा दि.१८/०५/२०२६ ते दि.२९/०५/ २०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेत-स्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहे. तसेच ताडी दुकानाचा जाहीर ई-लिलाव दि. २९/०५/२०२६ रोजी होणार असून याची सर्व इच्छूक निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

ताडी दुकानाची यादी, इतर नियम ई लिलाव-नि-निविदा बाबतच्या अटी व शर्ती इत्यादी बाबतची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in व http://www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहिती आवश्यक असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर-१ व २ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

ठिकाण :- अहिल्यानगर.
दिनांक :- /०५/२०२६

(प्रमोद सु. सोनोने)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -१

(ऋषिकेश इंगळे)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -२

महाराष्ट्र शासन
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर १ व २ यांचे कार्यालय.
जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जी.पी.ओ. रोड, जि.अहिल्यानगर ४१४००१
Email ID :- excisesupdtahmednagar@gmail.com
Email ID :- excisesupdtahilyanagar2@gmail.com


# अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचे फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रिया राबवून अनुज्ञप्त्या मंजूर करणेसाठी अटी व शर्ती

शासन निर्णय क्र - टिओडी-०६२१ /प्र.क्र.८९ /राउशु-३, दि. ३० ऑगस्ट, २०२१ नुसार महाराष्ट्र ताडी दुकाने (अनुज्ञप्ती मंजूरी ) आणि ताडी झाडे ( छेदणे ) नियम, १९६८ व मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे पत्र क्रमांक. टीओडी ११२०२०/ताडी धोरण/११, दिनांक. २२ जुलै, २०२५ अन्वये, ताडी व्यवसायाला स्थैर्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने सन २०२५-२६ या कालावधी करीता लिलाव-नि-निविदा या पध्दतीचा अवलंब करुन सन २०२५-२६ या कालावधीरीता राज्यातील ताडी दुकाने वितरणासाठी ई लिलाव-नि-निविदा प्रक्रीया राबविण्याबाबत आदेशीत केले आहे. सदर प्रक्रीया http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या कालावधीकरीता लिलाव -नि-निविदा प्रक्रीया राबविण्यात येणार आहे.

वरील शासन निर्णय व मा. आयुक्तांच्या पत्रानुसार सन २०२५-२६ या कालावधी करीता अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकाने (सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२२-२३ व सन २०२४-२५ या कालावधीत नुतनीकरण न झालेल्या ताडी अनुज्ञप्तींचे पुन्हा लिलाव-नि-निविदा प्रक्रियाद्वारे वितरण करण्याबाबत तसेच शासन निर्णय प्रमाणे नवीन दुकाने मंजूर करण्यात येणारे.) सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे फेर ई लिलाव-नि-निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. त्याबाबत शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. ताडी माडी दुकानाच्या फेर जाहीर ई लिलाव-नि-निविदा तारीख, वेळ खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदा प्रसिध्द | दि. १८/०५/२०२६ वेळ ११.०० वा. |
| २ | ई निविदा उपलब्ध कालावधी | दि.१८/०५/२०२६ वेळ ११.००वा ते दि.२३/०५/ २०२६ वेळ १७.०० वा. पर्यंत |
| ३ | प्री बिड मिटींग | दि. २२/०५/२०२६ |
| ४ | EMD/ईसारा जमा करणे (ऑफलाईन ) | दि.१८/०५/२०२६ ते दि.२५/०५/२०२६ (अधीक्षक, रा.उ.शु, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत.) |
| ५ | तांत्रिक लिफाफा उघडणे (Technical Cover) | दि. २६/०५/२०२६ वेळ १७.०० वा.पासून |
| ६ | दरपत्रक लिफाफा उघडणे ( शक्य झाल्यास ) | दि. २६ /०५/२०२६ वेळ १८.०० वा. |
| ७ | ई लिलाव प्रसिध्द (शक्य झाल्यास ) | दि. २६ /०५/२०२६ वेळ १८.३० वा. |
| ८ | ई लिलाव बोली बोलण्याचा कालावधी | दि. २९/०५/२०२६ वेळ ८.०० वा. ते १७.०० वा. पर्यंत |

(ई लिलावाच्या तारखामध्ये बदल होऊ शकतो, बदल झाल्यास http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)

२. सर्व पात्र / इच्छुक इसमांकडे फेर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी (enroll) करणे आवश्यक आहे.

३. सर्व पात्र / इच्छुक इसमांकडे फेर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता स्वत:चे DSC (Digital signature Certificate ) असणे आवश्यक आहे.

४. फेर ई लिलाव-नि-निविदा संदर्भातील कागदपत्रे ऑनलाईन ( Online ) सादर करणे आवश्यक आहे.

५. कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त नमूद वेळेनंतर निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच निविदा फक्त Online पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही पध्दतीने निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

६. Online पध्दतीने निविदा सादर करताना Technical Documents असे लिहिलेल्या Option वर क्लिक करुन सर्व कागदपत्रे सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे PDF Format तांत्रिक लिफाफयामध्ये Upload करावे. तसेच तांत्रिक लिफाफयामध्ये सादर करावयाच्या कागदपत्राची यादी सोबत जोडली आहे.

७. Work Item Documents मध्ये उपलब्ध असलेली बि. ओ. क्यु (B. O. Q. Excel Sheet) डाऊनलोड करुन घ्यावी. बि. ओ. क्यु ( B. O. Q.) मध्ये Name of bidder / Name of the bidder company असे नमूद केलेल्या रकान्यात स्वत:चे / कंपनीचे नाव नोंदवावे. ज्या दुकानासाठी निविदा भरावयाची आहे, त्या दुकानाच्या समोर बिड रक्कम भरण्यासाठी दिलेल्या रकान्यात बिड रक्कम भरावी. स्वत:चे / कंपनीचे नाव व बिड रक्कम भरल्यानंतर बि. ओ. क्यु (B. O. Q.) आर्थिक लिफाफयामध्ये अपलोड करावी.

८. निविदेच्या रक्कमेच्या ( बि. ओ. कयु मध्ये बिडर ने भरलेल्या रक्कमेच्या ) १/१० इतकी इसारा रक्कम दिनांक. १८/०५/२०२६ ते दिनांक. २९/०५/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर कार्यालयात जमा करावी लागेल. ही रक्कम अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांच्या नावे अनुसूचित बँकेतून काढलेल्या डिमांड ड्राफट या स्वरुपात राहील. निविदेच्या मोहोर बंद लिफाप्यावर दुकानाचे नाव ---------------, तालुका ----------, जि.अहिल्यानगर, दिनांक. सन २०२५-२६ या कालावधी साठी किरकोळ ताडी विक्रीसाठी देण्यात येणारी दुकाने करीता मोहोरबंद निविदा असे नमूद करावे.

९. पुढील कारणास्तव निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

अ. सशर्त निविदा असल्यास.

ब. निविदेसोबतची इसरा रक्कम निविदा रक्कमेच्या १/१० पेक्षा कमी असल्यास

क. इसारा रक्कम अनुसचित बॅकेतून काढलेल्या डिमांड ड्राफट च्या स्वरुपात नसल्यास

ड. इसारा रक्कम धनादेशाव्दारे (चेकने) देण्यात आल्यास.

इ. आवश्यक कागदपत्र अपलोड व सादर केले नसल्यास.

१०. ज्या व्यक्तीने ई निविदा भरलेली आहे फक्त अशाच व्यक्तीस ई-लिलावात भाग घेता येईल. ई निविदा न भरलेल्या व्यक्तीस ई लिलावात भाग घेता येणार नाही.

११. यशस्वी बोलीधारक इसारा रक्कम बोलीच्या रक्कमेत समायोजित करण्यात येईल. यशस्वी बोलीधारका व्यतीरिक्त इतर व्यक्तीना लिलाव संपल्यानंतर सदरची रक्कम परत केली जाईल मात्र त्याकरीता त्यास इसारा पावती लिलाव प्राधिका-याकडे परत करावी लागेल.

१२. लिलाव प्राधिकारी कोणत्याही इसमास त्यांच्या नावे देशी दारु किरकोळ विक्री परवाना असल्यास अथवा त्याची सरकारी थकबाकी आहे या मुदयावर बोली नाकारु शकेल.

१३. जर एखादया व्यक्तीस महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ खाली एखादया अपराधासाठी किंवा एखादया दखलपात्र आणि बेजमानती अपराधासाठी किंवा गुंगीकारक द्रव्य व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ किंवा औषधी द्रव्ये व सौदर्य प्रसाधने अधिनियम, १९५५ किंवा मुंबई औषधी द्रव्ये (नियत्रंण) अधिनियम, १९५९ किंवा ट्रेड ॲण्ड मर्कण्डाईज मार्क्स अधिनियम, १९५८ याखाली किंवा भारतीय दंड संहितेची कलमे ४८२ व ४८९ (दोन्ही धरुन) याखाली किंवा सिमा शुल्क अधिनियम, १९६२ च्या प्रकरण १४ खाली अपराधासाठी शिक्षा पात्र असेलेला कोणताही अपराध केल्याबाबत सिध्दापरध ठरविण्यात आले असेल तर लिलाव प्राधिकारी अशा व्यक्तीने भरलेली निविदा स्विकारणार नाही.

१४. जी व्यक्ती लिलाव प्राधिका-यांचे मते सट्टेगीरी किंवा विशिष्ट हेतून बोली बोलत आहे असे निदर्शनांस आल्यास अशा व्यक्तीस बोली बोलण्यास अपात्र ठरविण्यात येईल. तसेच बोली स्विकारताना खुली किंवा गुप्त एकाधिकारशाही निर्माण होत आहे. असे निदर्शनांस आल्यास अशा इसमास अथवा गटास लिलाव प्राधिकारी बोली बोलण्यास मज्जाव करु शकतील.

१५. लिलाव हे उक्त नमूद आदेशांच्या तरतुदीनुसार असल्याने लिलावात भाग घेणा-या बोलीधारकांवर व निविदाधारकांवर आदेशाच्या तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१६. बोली व निविदा यांचा तुलनात्मक विचार करुन राज्याच्या महसूलाच्या हिताच्या दृष्टीने विचार करुन योग्य तो निर्णय प्राधिकारी घेतील.

१७.लिलावामध्ये एकदा एखादी बोली उघडल्यानंतर त्या व्यहाराबाबत नंतर कोणताही देकार विचारात घेण्यात येणार नाही. लिलाव प्राधिकारी याबाबत कोणतीही वाटाघाटी करणार नाही.आणि एकदा अंतिम केलेल्या लिलावावर लिलाव प्राधिका-याकडून फेरविचार केला जाणार नाही.

१८. अयशस्वी निविदाकारास दिलेली इसारा रक्कम त्यास परत करण्यात येईल.

१९. प्रत्येक लिलाव खरेदीवर त्याला दिलेल्या अनुज्ञप्तीच्या आणि या संदर्भात केलेल्या नियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याने करुन दयावयाच्या प्रतीरुप कराराच्या अटीचे व हप्त्याच्या रक्कमेएवढी प्रतिभूती घेऊन (अनामत रक्कम) शासकीय कोषागारात भरावा लागेल व राहिलेली रक्कम समान पाच मासिक हप्त्यामध्ये भरणा करावी लागेल.

२०.लिलाव खरेदीदाराने उपरोक्त अट क्रमांक २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे १/४ व १/६ रक्कम व माहे आक्टोंबर ची हप्त्याची रक्कम भरण्यास कसूर केल्यास भरलेल्या इसारा रक्कमेचे राज्य शासनाकडे समपहरण करण्यात येईल. तसेच राज्य शासनाला त्या खालोखालची सर्वोच्च बोली स्विकारण्यामध्ये अथवा फेरलिलावामध्ये मिळालेल्या बोलीच्या रक्कमेमध्ये झालेल्या हानीस तो कसूरदार लिलाव खरेदीदार जबाबदार असेल नंतरच्या लिलावामध्ये मिळालेली रक्कम ही पहिल्या लिलावामध्ये मिळालेल्या रक्कमेपेक्षा कमी असल्यास किंवा जर पहिल्या लिलावामध्ये नंतरच्या मिळालेल्या रक्कमेपेक्षा कमी असल्यास किंवा जर पहिल्या लिलावामध्ये नंतरच्या खालोखाल बोलीदाराची रक्कम स्विकारण्यात आली असेल तर अशा फरकाची रक्कम कसूरदाराकडून प्रदान करण्यात आलेली नसल्यास ती जमीन महसूलाची थकबाकीप्रमाणे त्यांच्याकडून वसुल करण्यात येईल.

२१. उर्वरित शिल्लक रक्कम हप्त्याने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी किंवा ५ तारखेपर्यत न भरल्यास त्यावर द. सा. द. शे. २४ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. जर हप्त्याची रक्कम महिन्यांच्या शेवटच्या तारखेपर्यंत व्याजासह जमा न झाल्यास त्या ताडी दुकानांच्या परवानाधारकाच्या स्वखर्चाने फेरलिलाव करण्यात येईल व दुस-या लिलावात वसूल झालेली रक्कम ही पहिल्या लिलावाच्या रकमेपेक्षा कमी असल्यास फरकाची रक्कम पहिल्या परवानाधारक यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

२२.लिलाव-नि-निविदेव्दारे ज्याची बोली स्विकारण्यात आली आहे. अशा प्रत्येक व्यक्तीने अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांच्या समक्ष १ प्रतिरुप करार लिलाव झाल्यापासून १५ दिवसाचे आत न चुकता पूर्ण केला पाहिजे.

२३. कोणत्याही कारणामुळे यशस्वी बोलीधारकास झालेल्या नुकसान भरपाईचा दावा करता येणार नाही.

२४. यशस्वी बोली धारकास पुर्णपणे त्याच्या करारास अनुसरुन वागावे लागेल. तसेच महाराष्ट्र ताडी दुकाने ( लिलाव-नि-निविदाव्दारे लायसन्स देणे ) आदेश २००१ व महाराष्ट्र ताडी दुकाने ( अनुज्ञप्ती देणे ) व ताडी झाडे ( छेदणे ) नियम १९६८ च्या तरतुदी नियम व अटी बंधनकारक राहतील.

२५. ज्या व्यक्तीच्या नावे लिलावात ताडी दुकान मंजूर करण्यात येईल, अशा व्यक्तीला अन्न व भेसळ प्रतिबंध कायदा १९५५ नुसार ताडी विक्री करण्यासाठी उचित अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक आहे.

२६. टी. डी. - १ अनाप्तीधारकाला नमुना सीएल /एफल /टीओडी-३ अनुज्ञप्ती ताडी दुकानात देशी दुरुच्या सिलबंद बाटल्या विक्री करण्यासाठी परवानगी मिळणार नाही.

२७. लिलाव-नि-निविदा पध्दतीने ताडी / माडी दुकान घेतलेल्या बोलीधारकांना टी.डी-१ अनुज्ञप्ती मंजूर करण्यासाठी अर्जामध्ये ताडी / माडी दुकान ज्या जागेमध्ये प्रस्थापित करणार त्या जागेची चर्तुसिमा नमूद करावी.

२८. यशस्वी बोली बोलणारा इसम ताडी / माडी दुकानाकरीता जागा मिळविण्यास जबाबदार राहील. ताडी विक्री अनुज्ञप्ती नमुना टि.डी-१ चालू करण्याकरीता जागेबाबत पुढील शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

A. ताडी दुकानाच्या जागेचे क्षेत्रफळ ९ चौ. मी. पेक्षा कमी असता कामा नये. तसेच ताडी दुकानातील ताडी पीत असलेली व्यक्ती बाहेरील लोकांच्या दृष्टीस पडणार नाही अशी व्यवस्था केली पाहिजे.

B. ताडी दुकानाच्या जागेचे अंतर शैक्षणिक किंवा धार्मिक संस्थेपासून अ व ब नगरपरिषद हद्दीत किमान ५० मिटर तर इतर ठिकाणी किमान १०० मीटर दूर असले पाहिजे.

C. ताडी दुकानाच्या जागेचे अंतर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या कुठल्याही स्टॅण्ड, स्टेशन किंवा डेपोपासून किमान १०० मीटर दूर असले पाहिजे.

D. ताडी दुकानाची जागा जिल्हाधिकारी अगर त्यांनी अधिकृत केलेल्या अधिका-याच्या मते ताडी-माडी विक्रीकरीता योग्य असली पाहिजे. (शैक्षणिक संस्थेमध्ये जिल्हा परिषद किंवा तत्सम प्राधिकारणाने किंवा राज्य / केंद्र शासनाने पुरस्कृत केलेली पूर्व प्राथमिक / प्राथमिक व माध्यमिक विदयालय तसेच कायदयान्वये प्रस्थापित विदयापिठाशी संलग्न असलेल्या महाविदयालयाचा समावेश असून खाजगी शिकवणी व वर्ग याचा समावेश नाही. धार्मिक संस्थामध्ये मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा १९५० अन्वये केलेल्या किंवा राज्य सरकारने जाहीरकेलेली मंदिर /मठ / मस्जिद / चर्च / अग्यारी तसेच सार्वजनिक धार्मिक प्रार्थनास्थळे ही अंतर्भूत आहेत.)

E. ताडी दुकानाच्या जागेचे अंतर राष्ट्रीय स्मारक, राष्ट्रीय नेत्याचे पुतळे याठिकाणापासून १०० मी. दूर असले पाहिजे.

२९. प्रत्येक टी. डी. - १ अनुज्ञप्तीधारकाला त्यांच्या दुकानात काम करणा-या व बनात काम करणा-या नोकरांचा विहीत शुल्क भरुन नोकरनामा काढणे आवश्यक आहे.

३०.टी. डी. - ५ छेदन परमिट मिळाल्याशिवाय झाडे छेदणारा व टि. डी. - १ अनुज्ञप्ती मिळाल्याशिवाय दुकान चालवणा-या इसमाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३१. ताडी झाडे मिळविण्याची पूर्ण जबाबदारी अनुज्ञप्तीधारक यांच्यावर राहील. महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक :- टि. ओ. डी. १२९६ - २६ (२) इ. एक्स. सी. - ३, दि. ०८/०८/१९९५ नुसार वृक्षकर माफ करण्यात आला आहे.

३२.थकबाकीदाराच्या अनुज्ञप्त्या निलंबित अगर रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. अनुज्ञप्तीधारकाकडे एकापेक्षा जास्त अनुज्ञप्त्या असतील तर त्या थकबाकी वसूलीची तसेच इतर अबकारी अनुज्ञप्त्या निलंबित किंवा रद्द करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत.

३३.जे नियम सध्या लागू आहेत व पुढे जे नियम किंवा आदेश वेळोवेळी अंमलात येतील ते टी. डी. - १ अनुज्ञप्तीधारकांना बंधनकारक राहतील.

३४. ताडी दुकानाच्या जागे संदर्भात कोणतेही वाद किंवा तक्रार असल्यास यशस्वी बोलीधारक जबाबदार राहील.

३५.थकबाकीदारांना लिलावात भाग घेता येणार नाही.

३६.ज्या तालुक्यात ताडी दुकान (अनुज्ञप्ती) मंजूर आहे ते मंजूर दुकान ( अनुज्ञप्ती ) त्या तालुक्यातुन इतरत्र व मंजूर कार्यक्षेत्राबाहेर हलविता येणार नाही.

३७. भेसळयुक्त ताडी विक्री / अवैध ताडी विक्री झाल्यास संबंधीत अनुज्ञप्तीधारकावार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

३८.ई-लिलावात बोली बोलणाऱ्या अथवा ई निविदा देणाऱ्या व्यक्तिकडे योग्य ते दस्ताऐवज महाराष्ट्र राज्यातील अधिकारी / संस्थांनी दिले असतील तरच ते स्वीकारले जातील व अन्य राज्यातील अधिकारी / संस्थांनी दिले असतील ते नाकारले जातील.

३९. सदर ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छूक निविदाकाराने शासनाने निश्चित केलेल्या ताडी दुकानाच्या रकमेऐवढे व त्यापेक्षा अधिक रकमेचे ऐपतदार प्रमाणपत्र निविदाकराने सादर करणे आवश्यक आहे. जेवढया रकमेचे ऐपतदार प्रमाणपत्र सादर करणार / अपलोड करणार आहे, तेवढया रकमेपर्यंत निविदा भरण्यास व बोली बोलता येईल. त्यापेक्षा अधिकची बोली स्वीकारण्यात येणार नाही, निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

४०. ज्या मालमत्तेच्या आधारे ऐपतदार प्रमाणपत्र सादर केले असेल त्या मालमत्तेच्या आधारे सरकारी कार्यालयातील नोंदीवर इतर हक्क जिल्हाधिकारी किंवा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांची नावे फक्त नोंदणी रकान्यात नोंदवावी लागतील. अशी नोंदणी झाल्यावर यशस्वी बोली बोलणाऱ्यास टी- डी. - १ अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येईल. मालमत्तेच्या कागदपत्राची नोंद करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी यशस्वी बोलीधारकांची राहील.

४१. जर एखादी व्यक्ती महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ च्या नियम २४ प्रमाणे सीएल-३ अनुज्ञप्ती धारण करणारी असेल तर लिलाव प्राधिकारी त्यांची बोली किंवा निविदा फेटाळतील.

४२. ई लिलावामध्ये बोली लावताना एखाद्या दुकानाच्या निश्चित केलेल्या किंमतीवर किमान रु.५,०००/- किंवा त्याच पटीत जास्तीने बोली लावता येईल.

४३. एखाद्या ताडी अनुज्ञप्तीधारकाने त्यांच्या अनुज्ञप्ती मिळालेल्या दुकानाची बोलीची संपुर्ण रक्कम भरली असेल पण त्यांनी आपल्या परिसरातील आपले ताडी दुकान कोणत्याही कारणास्तव बंद ठेवले असेल वा कोणत्याही परिसरातील अनुज्ञप्ती मिळालेली ताडी दुकाने जिल्हाधिकारी यांचे समाधान होईल अशा प्रकारे चालवले नाही, तर जिल्हाधिकारी ताडी वर्षामध्ये त्या परिसरामध्ये अतिरिक्त ताडी दुकान किंवा दुकाने मंजूर करु शकतील आणि अशा दुकानाचा वा दुकानांचा लिलाव करुन शकतील.

४४. अनुज्ञप्तीच्या मुदतीत जनहिताच्या दृष्टीने विक्रीच्या वेळेत बदल करणे किंवा दुकान बंद ठेवण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

४५. अनुज्ञप्तीधारकाने त्यांनी घेतलेल्या ताडी दुकानाची किंमत वसूल होईल इतकी ताडी वा शिंदीची झाडे वर्षभरता घ्यावीत व त्यापासून काढलेली शुध्द ताडी दुकानातील गिऱ्हाईकांना पिण्यास मिळेल याची दक्षता घ्यावी. दुकानात ताडी खेरीज इतर मादक पदार्थ क्लोरल हैड्रेट मिश्रीत ताडी वा दारु विक्री केल्यास ताडी अनुज्ञप्तीधारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल व अनुज्ञप्ती रद्य होण्यास पात्र ठरेल.

४६. शासनाने महत्त्वाच्या दिवशी जाहीर केल्याप्रमाणे किंवा सक्षम अधिकाऱ्याने आदेशित केलेल्या दिवशी ताडी दुकाने बंद ठेवावी लागतील. याबाबतीत कोणतीही नुकसार भरपाई मिळणार नाही.

४७. प्रत्येक अनुज्ञप्तीधारकावर राज्य शासनाने तसेच आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, जिल्हाधिकारी व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांनी वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना, मार्गदर्शक तत्त्वे इ. चे पालन करणे बंधनकारक राहील.

४८. अ) कोणत्याही अटीच्या अर्थाबद्यल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उदभवल्यास

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचा निर्णय अंतिम राहील.

ब ) आवश्यक वाटल्यास ताडी दुकान रद्द करणे अथवा उपरोक्त अटी शर्तीमध्ये पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा / राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे.

क) वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास अनामत रक्कम व लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार इतरही कायदेशी कारवाई करण्यात येईल.

ड) जाहीरनोटीसमध्ये दिलेल्या अटीमध्ये आयत्या वेळी बदल करण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

४९. सन २०२५-२६ या ताडी वर्षात फेर लिलाव-नि-निविदा आणि नुतनीकरण प्रक्रिया राबविल्यानंतर वितरीत केलेल्या ताडी दुकानांचे पुढील एक वर्ष म्हणजे दिनांक.३१.०८.२०२६ अखेर पर्यंत नुतनीकरण करण्यात येणार आहे.

५०.निविदाधारक यांच्याकडे अहिल्यानगर जिल्हयातील प्रत्येकी महानगर पालिका क्षेत्रात आणि अ वर्ग नगरपालिका क्षेत्रात ८००-१००० तसेच इतर ठिकाणी ४००-५०० परिपक्व ताडी झाडे उपलब्ध असल्याबाबतचा पुरावा सक्षम प्रधिकारी / यांचा दाखला (७/१२) निविदाधारकने सादर करणे आवश्यक आहे.

<u>ठिकाण</u> :- अहिल्यानगर.
<u>दिनांक</u> :- /०५/२०२६

(प्रमोद सु. सोनोने)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -१

(ऋषिकेश फुंगळे)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -२

महाराष्ट्र शासन
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर १ व २ यांचे कार्यालय,
जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जी.पी.ओ. रोड, जि.अहिल्यानगर ४१४००१
Email ID :- excisesupdtahmednagar@gmail.com
Email ID :- excisesupdtahilyanagar2@gmail.com

## अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचे जाहीर फेर ई लिलाव-नि-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक कागदपत्रे / Technical Cover मध्ये जोडावयाच्या कागदपत्रांची यादी.

१. निविदाधारक (Bidder) यांचे आधारकार्ड व पॅन कार्ड.

२. ऐपतदारी प्रमाणपत्र. ( Solvency Certificate )

Technical Cover मध्ये निविदाधारकास शासनाने प्राधिकृत केलेल्या महसूल अधिकाऱ्यांनी दिलेला ऐपतीचा दाखला वा राष्ट्रीय / अनुसुचित बँकेची बँक गॅरंटी जमा करावी.

३. EMD / ईसारा रक्कमेचा DD ची Scan Copy.

( ईसारा रक्कम - निविदाधारक (Bidder) यांनी भरलेल्या निविदेच्या रकमेच्या १/१० इतकी रक्कम )

४. नोंदणीकृत सहकारी व भागीदार संस्था यांचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.

५. भागीदारी पत्र

जेव्हा दोन किंवा अधिक इसमाना भागीदारीने अनुज्ञप्ती धारण करावयाची असेल तर तांत्रिक लिफाफयामध्ये निविदाकारास आपली भागीदारी जाहीरकेली पाहिजे. तसेच भागीदारीपत्र सादर करावे.

६. शपथ पत्र

i. निविदाधारकाच्या (Bidder) नावे कोणत्याही प्रकारची अन्य अबकारी अनुज्ञप्ती नाही, राज्य उत्पादन शुल्क विभागाची थकबाकी नसल्याचे व

गुन्हे दाखल नसावे तसेच निविदाधारकाच्या नावे सीएल-३ अनुज्ञप्ती मंजूर नसल्याचे शपथपत्र. ( रु. १०० च्या मुद्रांक पेपरवर )

ii. निविदाधारकावर (Bidder) कोणतीही फौजदारी कारवाई किंवा बनावट ताडी विषयक गुन्हा दाखल न झालेबाबतचे शपथपत्र. ( रु. १०० मुद्रांक पेपरवर)

iii. लिलावात सहभागी होऊन टी. डी. - १ प्राप्त झाल्यास संपुर्ण शासकीय शुल्क भरणे माझ्यावर ( निविदाधारक) (Bidder) बंधनकारक राहिल / असेल याबाबतचे शपथपत्र. ( रु. १०० मुद्रांक पेपरवर )

७. वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावीत.

ठिकाण :- अहिल्यानगर.
दिनांक :- /०५/२०२६

Bhosle 9314
(प्रमोद सु. सोनोने)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -१

R.A.Ingle 93/05/2026
(ऋषिकेश इंगळे)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर -२

**मा.जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क), अहिल्यानगर यांचे कार्यालय, जि.अहिल्यानगर.**

**अहिल्यानगर जिल्हयातील ताडी दुकानांचा सन २०२५-२६ या ताडी वर्षाकरीता लिलाव नि निविदा व नुतनीकरण पध्दतीने वितरण करण्यासाठी ताडी दुकानांची व त्यांच्या लिलावाची अपेक्षित किंमत दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र. | ताडी दुकानांची नावे (ताडी अनुज्ञप्ती/ टीडी-१ अनुज्ञप्ती) | ताडी दुकानांची सन २०२५-२६ मध्ये लिलाव करण्यासाठी अपेक्षित किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | सुपा, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर | ५,१९,३८३/- |
| २ | लोणीमावळा, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर | २,२१,८७८/- |
| ३ | गांजीभोयरे, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर | २,९७,९४५/- |
| ४ | कान्हूरपठार, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर | २,८७,८३८/- |
| ५ | श्रमिकनगर, ता.नगर, जि.अहिल्यानगर | १०,००,०००/- |
| ६ | पुणतांबा, ता.राहाता, जि.अहिल्यानगर | ९,३५,७६९/- |
| ७ | कोल्हार, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर | ७,२८,४६२/- |
| ८ | राहुरी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर | ७,२८,४६२/- |
| ९ | घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर | १०,००,०००/- |
| १० | साकुर मांडवा, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर | १०,००,०००/- |
| ११ | सोनई, ता.नेवासा, जि.अहिल्यागर | २,७९,३७१/- |
| १२ | प्रवरासंगम, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर | २,७९,००८/- |
| १३ | घोडेगांव, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर | २,७९,९४६/- |
| १४ | झापवाडी, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर | २,७९,१३०/- |

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
अहिल्यानगर-१

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
अहिल्यानगर-२

Signature Not Verified
Digitally signed by SATYAM MARUTI KHARATMAL
Date: 2026.05.19 12:03:49 IST
Location: Maharashtra-MH